**वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत**
**पोहोचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०८ जून, २०२२

वाचा : १) केंद्र शासनाच्या भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण कार्यालयाचे क्र.१-१/२०१९-UIDAI (DBT) दि.२५ नोव्हेंबर, २०१९ चे परिपत्रक.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती २०१०/प्र.क्र.४८/३९ दि.३ एप्रिल, २०१०.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्यांक विकास, कौशल्य विकास व उद्योजकता, शालेय शिक्षण व क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, तसेच महिला व बालविकास या विभागामार्फत पोषण आहार, विविध सवलती व वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. बालकांना तसेच समाजातील इतर वंचित घटकांना कल्याणकारी राज्याच्या विविध योजनांच्या मुख्य प्रवाहात राहता यावे व एकही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून पोषण आहार, विविध सवलती व वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शी पद्धतीने पोहोचविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनाच्या आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्यांक विकास, कौशल्य विकास व उद्योजकता, शालेय शिक्षण व क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, तसेच महिला व बालविकास या विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या पोषण आहार, विविध सवलती व वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे :-

१) वर नमूद केलेल्या सर्व विभागांनी आपल्या विभागातील मास्टर डेटाबेस अद्ययावत करण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करावी. विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या सर्व लाभार्थ्यांचा डेटाबेस तयार करुन तो आधारशी संलग्निकृत करण्यात यावा.

२) ज्या विभागांमध्ये पोषण आहार व तत्सम बाबींचा धान्य पुरवठा होत असतो त्या वाहनांकरिता GPS Tracking System डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत पूर्णपणे कार्यान्वित करणे अनिवार्य राहील.

३) पोषण आहार योजनेंतर्गत महिला व बाल विकास, शालेय शिक्षण व क्रीडा, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास आणि इतर बहुजन कल्याण विभागांनी पोषण आहाराशी संबंधित सर्व लाभार्थींची नावे आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य राहील. पोषण आहाराशी संबंधित सर्व लाभार्थी आधार कार्डशी जोडूनच दिनांक ०१ जानेवारी, २०२३ पासून संबंधित योजनांना निधी वितरीत करण्यात यावा.

४) सर्व विद्यार्थी नियमितपणे शाळा व महाविद्यालयामध्ये हजर राहतील याची दक्षता घेण्यासाठी त्यांच्या नोंदणी व प्रतिदिन उपस्थितीकरीता Web Based Application च्या मदतीने विभागांनी Master Data Base अद्ययावत ठेवण्याची प्रक्रिया डिसेंबर,२०२२ अखेरपर्यंत पूर्ण

करणे अनिवार्य राहील. सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार संलग्नित Master Data Base अद्ययावत ठेवून प्रतिदिन उपस्थितीच्या नोंदीप्रमाणेच दिनांक ०१ जानेवारी, २०२३ पासून संबंधित योजनांचा निधी वितरीत करण्यात यावा.

५) शिष्यवृत्तीसाठी पात्र कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्तीशी संबंधित सर्व विभागांच्या योजना आधारशी संलग्निकृत करुनच दिनांक ०१ जानेवारी, २०२३ पासून DBT मार्फत शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.

६) संबंधित विभागाने त्या विभागाशी संबंधित योजनांसदर्भात आधार अधिनियमाच्या तरतूदी, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश व संदर्भ क्र.१ मधील परिपत्रक तसेच याबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना यासर्व बाबी लक्षात घेऊन माहिती व तंत्रज्ञान आणि विधी व न्याय विभागाची सहमती घेऊन या शासन निर्णयान्वये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता आधार कायद्याच्या कलम ७ प्रमाणे अध्यादेश काढण्याची कार्यवाही वेळेत करावी.

७) उपरोक्त विभागाच्या सचिवांनी आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या योजनेतील सर्व लाभार्थ्यांना आधारशी संलग्निकृत करण्यासाठी नोव्हेंबर, २०२२ पर्यंतचे नियोजन सोबत जोडलेल्या "**प्रपत्र अ** " प्रमाणे हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून १० दिवसांच्या आत करावे. वरील नियोजनाप्रमाणे आधार संलग्निकृत करण्याची कार्यवाही प्रत्येक महिन्यात आढावा घेवून योग्य पद्धतीने राबविण्याची जबाबदारी संबंधित सचिवांची राहील. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये संबंधित सचिवांनी याबाबतचा अंतिम आढावा घ्यावा. ज्या जिल्हयांमध्ये आधार संलग्निकृत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली नसेल त्या जिल्हयांमध्ये कोणत्याही परिस्थितीत दि.३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत सर्व लाभार्थ्यांची आधारशी संलग्निकृत करण्याची कार्यवाही (नव्याने समाविष्ट होणारे लाभार्थी धरुन) पूर्ण करण्यात यावी.

८) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती २०१०/प्र.क्र.४८/३९ दि.३ एप्रिल, २०१० अन्वये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गठित केलेल्या समितीमधील सदस्य सचिव (प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान) आणि अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांना मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सोबत जोडलेल्या "**प्रपत्र ब**" प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावा.

२. "**प्रपत्र अ**" मध्ये असलेला कालबध्द कार्यक्रम तसेच "**प्रपत्र ब**" मध्ये असलेला मासिक प्रगती अहवाल योजनानिहाय वेगवेगळे तयार करणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०६०८१५३८३२६४०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANOJ SAUNIK

Digitally signed by MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f25a53a24b8d29e40821466854d96b314a8f72e7aed285522fcb6722abee3e2b, pseudonym=48182827AD47984A4BFC95C2CAF85A210F8E2B53, serialNumber=446051267064F6E7A79A97AD1D4D1A909EC8DC2504DAA67CE24795E4626AD8EE, cn=MANOJ SAUNIK
Date: 2022.06.08 16:43:00 +05'30'

**( मनोज सौनिक )**
**अपर मुख्य सचिव (वित्त)**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.

२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननिय सदस्य विधानपरिषद/ विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
८) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
९) मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
१०) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
१३) महालेखापाल) ,लेखा परिक्षा-१) महाराष्ट्र ,मुंबई.
१४) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता)१ महाराष्ट्र, मुंबई.
१५) महालेखापाल, (लेखा परिक्षा-२) महाराष्ट्र, नागपूर.
१६) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता)२ महाराष्ट्र, नागपूर
१७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई
२२) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
२३) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
२४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४ राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४
२५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
२६) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
२७) नॅशनलिस्ट कॉंगेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, ठाकरसी हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई १
२८) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
२९) वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०) निवड नस्ती, वित्त विभाग /अर्थबळ.

-----------

# प्रपत्र “अ”

## आधार संलग्निकृत करण्याचा कालबध्द कार्यक्रम

**विभागाचे नाव :- ______________________**

**योजनेचे नाव :- ______________________**

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | एकूण लाभार्थीची संख्या | रकाना 3 पैकी मागील महिनाअखेर आधार संलग्निकृत झालेली लाभार्थी संख्या | शिल्लक लाभार्थी (३-४) | लाभार्थ्यांना आधारशी संलग्निकृत करण्याचे उद्दीष्ट | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जून, २०२२ | जुलै, २०२२ | ऑगस्ट, २०२२ | सप्टेंबर, २०२२ | ऑक्टोबर, २०२२ | नोव्हेंबर, २०२२ | एकूण (६+७+८ +९+१० +११) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

टिप : रकाना 5 आणि रकाना 12 मधील नमूद केलेली लाभार्थी संख्या एकच राहील.

**सचिवांची स्वाक्षरी**

**दिनांक -**

**सचिवांचे नांव-**

**<u>प्रपत्र “ब”</u>**

**<u>आधार संलग्न कार्यक्रम- मासिक प्रगती अहवाल</u>**

**विभागाचे नाव :- ________________________** **महिना- ,२०२२.**

**योजनेचे नाव :- ________________________**

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | एकुण लाभार्थी संख्या (चालू महिन्यात नव्याने समाविष्ट झालेल्या लाभार्थ्यांसह) | रकाना ३ पैकी मागील महिनाअखेर आधार संलग्निकृत लाभार्थी संख्या | प्रपत्र अ मधील नियोजनाप्रमाणे चालू महिन्याचे | | या महिनाअखेर आधार संलग्नीकृत करण्यासाठी शिल्लक लाभार्थी संख्या [३-(४+६)] | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्दिष्ट | साध्य | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

टिप : रकाना ५ मध्ये दिलेल्या उद्दिष्टांमध्ये नव्याने समावेश झालेल्या लाभार्थ्यांचा समावेश आवश्यक असेल.

**दिनांक**

**सचिवांची स्वाक्षरी**
**सचिवांचे नांव-**